दिनांक २१/०७/२०२० रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आदेशाने " **BEST RECOVERY OF THE MONTH** " **<u>माहे एप्रिल २०२०</u>** या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

**" ब "**

**<u>बेस्ट रिकव्हरी ऑफ दि मंथ एप्रिल— २०२०</u>**

| | | |
|---|---|---|
| **०१** | **एम.आय.डि.सी. पोलीस ठाणे.**<br>**परिमंडळ —१०** | गु.र.क्र. २५१/२०२०, कलम ४५४, ४५७, ३८०, १०९, १२०(ब), ३४ भादविसं |

**—: ' <u>दिवसा रात्रौ घरफोडी</u> ' :—**

**<u>गुन्हयाची थोडक्यात हकिकत</u> :—** नमुद गुन्हयातील फिर्यादी श्री. राजकुमार तिलकराज लुथरा यांची सोना ओव्हरसिज, गाळा नं. ११०, निरज इन्डस्ट्रिज इस्टेट, सनफार्मा समोर, महाकाली रोड, अंधेरी पुर्व, मुंबई या ठिकाणी हिरे जडीत सोन्याचे दागिने बनविण्याची कंपनी आहे.

दिनांक १९/०३/२०२० ते २२/०४/२०२० या लॉकडाऊन कालावधीचे दरम्यान अज्ञात इसम याने कंपनीच्या छताचा सिमेंटचा पत्रा तोडून, आत प्रवेश केला. व ग्राईंडर कटरच्या सहाय्याने तिजोरी कापून, त्यातील रुपये ७,०९,४८,९९२/— (सात करोड नऊ लाख अठ्ठेचाळीस हजार नवशे ब्याण्णव रु.) किमतीचे सोने— हिऱ्याचे दागिने व हिरे तसेच सोने मिश्रीत माती इत्यादी मालमत्ता घरफोडी करुन चोरुन नेली. फिर्यादी यांनी दिनांक २२/०४/२०२० रोजी एम.आय.डी.सी. पोलीस ठाणेस प्रत्यक्ष येवून दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंद करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. राजकुमार तिलकराज लुथरा, वय ५७ वर्षे, |
| चोरीस गेलेली मालमत्ता | | रूपये ७,०९,४८,९९२/— किंमतीची मालमत्ता त्यात हिरेजडीत सोन्याचे दागिने, हिरे, सोने मिश्रीत माती ( गोल्ड डस्ट) |
| हस्तगत मालमत्ता | :— | १) हिरे — किंमत रूपये ३,८२,७३,७२५/—<br>२) हिरेजडीत सोन्याचे दागिने — किंमत रूपये २,२०,४८,३६१/—<br>३) गोल्ड डस्ट — किंमत रूपये ४४,९१,५००/—<br>**<u>एकुण किंमत रु. ६,४८,१३,५८६/—</u>**<br>०१) ग्राईंडर कटर मशीन किंमत रुपये २,०००/—<br>०२) ॲक्टीव्हा स्कुटर नं. MH 48 AR 0041 कि. रु. ३०,०००/—<br>०३) ॲक्टीव्हा स्कुटर नं. MH 47 AS 2840 कि. रु. ३०,०००/— |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) विपुल आनंदा चांबरिया, वय ३५ वर्षे,<br>२) लक्ष्मण नरसप्पा दंडू वय ३५ वर्षे,<br>३) शंकर कुमार येशु, वय ४२ वर्षे,<br>४) राजेश शैल्लु मारपक्का,वय २९ वर्षे,<br>५) विकास तुळशीराम चनवादी, वय २४ वर्षे,<br>६) मुन्नाप्रसाद हिरालाल खैरवार, वय ४९ वर्षे,<br>७) धिमंत छोटालाल चौहाण, वय ३२ वर्षे,<br>८) इरफान लतीफ मुलाणी. वय ३४ वर्षे,<br>९) संतोष बापूराव राठोड वय ३५ वर्षे,,<br>१०) पंकज रामनिवर गौड, वय ३५ वर्षे,<br>०१) आरोपी क्र. १ ते ५ यांना दिनांक २७/०४/२०२० रोजी |

| | | |
|---|---|---|
| | | ०२) आरोपी क्र. ६ व ७ यांना दिनांक २८/०४/२०२० रोजी<br>०३) आरोपी क्र. ८ यास दिनांक ३०/०४/२०२० रोजी<br>०४) आरोपी क्र. ९ यास दिनांक ०१/०५/२०२० रोजी<br>०५) आरोपी क्र. १० यास दिनांक ०३/०५/२०२० रोजी |

**<u>तपास कौशल्य</u>** :— नमुद घरफोडीचा गुन्हा दिनांक १९/०३/२०२० ते २२/०४/२०२० रोजीचे दरम्यान लॉकडाऊनचे कालावधीत घडला होता. गुन्हयातील अज्ञात आरोपीतांनी गुन्हा करताना इलेक्ट्रीक लोखंड कटर मशिनचा वापर करून लोखंडी तिजोरी कापल्याचे घटनास्थळी दिसून आले. दिनांक १९/०३/२०२० ते २२/०४/२०२० रोजीचे दरम्यान नक्की कोणत्या दिवशी सदरची घरफोडी झाली आहे याची माहिती मिळणे आवश्यक होते. त्याकरीता प्रथम कंपनीला विदयुत पुरवठा करणारे टाटा पावर विदयुत कंपनीत जावून तपास केला असता, दिनांक ०६/०४/२०२० रोजी कंपनीचे विदयुत मिटरचे रिडींग सकाळी ०७.३० वा. ते दुपारी १२.३० वा. चे दरम्यान जलद गतीने चालू असल्याचे दिसून आले. लॉकडाऊनचे कालावधीत कंपनी बंद असताना दिनांक ०६/०४/२०२० रोजी अशा पध्दती विदयुत मिटर जलद गतीने सुरू असल्याचे दिसून आल्याने सदरची घरफोडी ही दिनांक ०६/०४/२०२० रोजी झाल्याबाबत नक्की झाले.

गुन्हयाचे घटनास्थळी असलेले सी.सी.टि.व्हि. व डि.व्ही.आर. हे देखील चोरटयांनी काढून घेऊन गेल्याने चोरटयाबाबत माहिती मिळणे अवघड झाले होते. फिर्यादी यांचे कंपनीत अज्ञात चोरटयांनी ज्या पध्दतीने प्रवेश करून चोरी केली होती. त्या पध्दतीवरून कंपनीचा माहितीगार व्यक्तीचा सदर गुन्हयात सहभाग असल्याची दाट शक्यता वाटल्याने कंपनीत सध्या काम करणारे एकूण ३५ ते ४० कामगार/कर्मचारी व पुर्वी काम करणारे कामगार/कर्मचारी असे सर्वाकडे गुन्हयाच्या अनुषंगाने तपास करण्यात आला. तपासामध्ये फिर्यादी यांचे कंपनीत सुमारे ०२ वर्षापूर्वी प्युन म्हणून काम करणारा पंकज रामनिवर गौड, वय ३५ वर्षे, रा.ठि. जे. व्हि. एल. आर., पवई मुंबई हा गुन्हा दाखल झाल्यानंतर त्याचे राहते परिसरातून कुठेतरी निघून गेल्याचे समजले. सदरबाबत परिसरातील खात्रीशिर बातमीदार यांचेकडून नमुद पंकज गौड हा विपुल आनंद चाबरिया याचे श्री एकता फाऊंडेशन या NGO मध्ये काम करत असल्याचे समजल्याने NGO चे संस्थापक विपूल चाबरिया यांचेकडे पंकज गौड तसेच गुन्हयाच्या अनुषंगाने कौशल्यपुर्वक व शिताफिने चौकशी केली असता, विपूल चाबरिया याने फिर्यादी यांचे कंपनीत पुर्वी काम करणारा पंकज गौड व फिर्यादी यांचे कंपनीत सध्या काम करणारा धिमंत छोटालाल चौहाण व त्यांचे इतर साथिदार यांनी सदर घरफोडी चोरी केल्याचे कबुल केले.

नमुद गुन्हा कोणी केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने इतर पाहिजे आरोपीतांचा शोध घेऊन नमुद गुन्हयात १) विपुल आनंदा चांबरिया, वय ३५ वर्षे, २) लक्ष्मण नरसप्पा दंडू, वय ३५ वर्षे, ३) शंकर कुमार येशु, वय ४२ वर्षे, ४) राजेश शैल्लु मारपक्का, वय २९ वर्षे, ५) विकास तुळशीराम चनवादी, वय २४ वर्षे, ६) मुन्नाप्रसाद हिरालाल खैरवार, वय ४९ वर्षे, ७) धिमंत छोटालाल चौहाण वय ३२ वर्षे, ८) इरफान लतीफ मुलाणी. वय ३४ वर्षे, ९) संतोष बापूराव राठोड, वय ३५ वर्षे, १०) पंकज रामनिवर गौड, वय ३५ वर्षे, यांना अटक करण्यात आली.

गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने यातील अटक आरोपीतांकडे वैयक्तीक कौशल्यपुर्ण तपास करून पोलीस कोठडी कालावधीमध्ये रूपये ३,८२,७३,७२५/— किंमतीचे हिरे, रूपये २,१९,०४०७२/— किंमतीचे हिरेजडीत सोन्याचे दागिने, रूपये ४४,९१,५००/— किंमतीचे गोल्ड डस्ट असे एकुण रूपये ६,४६,६९,२९७/— ( सहा करोड सेहेचाळीस लाख एकोणसत्तर हजार दोनशे सत्याण्णव रुपये) किंमतीची मालमत्ता हस्तगत करण्यात आली. तसेच गुन्हा करते वेळी वापरण्यात आलेले ग्राईंडर कटर मशीन किंमत रुपये २,०००/— व ॲक्टीव्हा स्कुटर नं. MH 48 AP 0041 [illegible]

३०,०००/— इत्यादी मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे.

एम.आय.डी.सी. हद्दीमध्ये असंख्य सोने व हिरे दागिने बनविण्याच्या कंपन्या असून सात करोड पेक्षा जास्त किंमतीच्या दागिन्यांची चोरी झाल्यामुळे दागिने बनविणाऱ्या व्यवसायिकामध्ये असुरक्षितेची व भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे सदरचा गुन्हा घडल्यानंतर असंख्य व्यापारांनी लॉकडाऊन कालावधीमध्ये त्यांच्या कंपनीतील मालमत्तेची पडताळणी करून नमुद दाखल गुन्हयातील पाहिजे आरोपीतांना लवकरात लवकर अटक करण्याची मागणी केली होती.

सदरचा गुन्हा दिनांक २२/०४/२०२० रोजी दाखल झाला. व दिनांक २७/०४/२०२० रोजी गुन्हा उघडकीस आणून गुन्हयातील चोरीस गेलेल्या मालमत्तेपैकी ९१.१५ टक्के मालमत्ता हस्तगत करण्यात आली. तपासी पथकाने अल्प कालावधीत सदरचा गुन्हा उघडकीस आणून चोरीस गेलेल्या मालमत्तेपैकी ९१.१५ टक्के मालमत्ता हस्तगत करण्यास यश मिळवले त्यामुळे गुन्हयातील फिर्यादी व इतर व्यवसाईक यांच्यामध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होऊन जनमानसातील पोलीसांची प्रतिमा उंचावली आहे.

**एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | जगदीश नरहरी शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक | दिपक विजय सुर्वे | प्रशस्तीपत्रक |
| ३ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | देविदास बालाजीराव मुपडे | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पोलीस उप निरीक्षक | विजय दत्तात्रय आचरेकर | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पोलीस उप निरीक्षक | गणेश बबन मोहिते | प्रशस्तीपत्रक |
| ६ | पो.ना.क्र. ९७०१७३ | बंडू बाबुराव सावंत, | प्रशस्तीपत्रक |
| ७ | पो.ना.क्र. ३३६०३ | शंकर लक्ष्मण काळे | प्रशस्तीपत्रक |
| ८ | पो.ना.क्र. ९७०७३२ | देविदास ओमकार सोनावणे | प्रशस्तीपत्रक |
| ९ | पो.शि.क्र. ०४.०७९१ | विनोद महादेव मलतवाडकर, | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.शि.क्र. ०६१३१९ | संभाजी विश्वनाथ काळे | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.शि.क्र. ०७०९६४ | शिवप्रसाद विश्वासराव पवार | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.शि.क्र. ०७०८३६ | ज्ञानेश्वर रामभाऊ गोसावी | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.शि.क्र. ०९०७३८ | प्रदिप सयाजीराव चव्हाण | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.शि.क्र. ०९१५७८ | प्रसाद रामदास वरे | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.शि.क्र. ११०१३८ | सुहास अधिकराव पवार | प्रशस्तीपत्रक |